17-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/16/2025 10:15 PM Page 1

निवडक

साखळीत उद्या कीर्तन शिबिराचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. १६ : गोमंतक संत मंडळ संचालित कीर्तन विद्यालय फोंडा आणि सम्राट क्लब सांखळी आयोजित निवासी कीर्तन प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन शुक्रवार दि. १८ रोजी संध्याकाळी ५ वाजता शिवस्मृती खेडेकर हॉल सांखळी येथे होणार आहे. हे शिबीर २० रोजीपर्यंत चालणार आहे. कार्यक्रमाला मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, ज्येष्ठ पत्रकार सागर जावडेकर,सम्राट क्लब इंटरनॅशनलचे अध्यक्ष प्रवीण सबनीस, सम्राट क्लब सांखळीच्या अध्यक्ष तनुजा शिरोडकर, कीर्तन विद्यालयाचे प्राचार्य सुहास वझे, समाजसेवक व प्रसिद्ध चित्रकार शिवानंद खेडेकर उपस्थित रहाणार आहेत. अधिक माहितीसाठी कीर्तन शिबिराच्या संयोजिका शुभदा सावईकर यांच्याकडे ९८२३१०८१६६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

बोणये-सावईवेरे येथील १९ रोजी 'प्रताप सूर्य शिवराया'

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. १६ : बोणये – सावईवेरे येथील श्री खामिणी देवीच्या गंधपुजेनिमित्त येत्या शनिवार दि. १९ रोजी 'प्रताप सूर्य शिवराया' हा ऐतिहासिक नाटयप्रयोग होणार आहे.
यानिमित्त सकाळी देवस्थानात श्रींची गंधपूजा, दुपारी आरती, तीर्थप्रसाद, संध्याकाळी ५ वाजता स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम, रात्री ९ वाजता श्री खामिणी बालनाट्य मंडळातर्फे 'प्रताप सूर्य शिवराया' हा दोन अंकी ऐतिहासिक नाटयप्रयोग होणार आहे. तरी सर्व रसिकांनी व भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

देऊळवाडा सूर्ला परिसरात आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. १६ : गुरुवार दि. १७ रोजी देऊळवाडा सूर्ला वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजता यावेळेत वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने देऊळवाडा सूर्ला परिसरात वीजपुरवठा असणार नाही. यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्वरी येथे २० रोजी प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती परीक्षा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १६ : पर्वरी येथील राज्य शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण मंडळाने इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहन शिष्यवृत्ती परीक्षा (प्रज्ञा शोध) २०२५ चे आयोजन केले आहे. ही स्पर्धा सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत गोवा राज्यातील १२ तालुक्यांतील विविध केंद्रांवर घेण्यात येईल. यामध्ये डिचोली तालुका– सी.एसएमएसएस सरकारी हायस्कुल – आसन क्र. ०१००१ ते ०१३८०, अवर लेडी ऑफ ग्रेस हायस्कूल, डिचोली आसन क्र. ०१३८१ ते ०१४९.१ बार्देश तालुका केंद्र जी.एस. आमोणकर विद्या मंदिर, म्हापसा येथे आसन क्रमांक ०२००१ ते ०२३२६ ; सेंट जोसेफ हायस्कुल पेडणे आसन क्र. ०३००१ ते ०३१८०, आणि भगवती हायस्कुल आसन क्र. ०३१८१ ते ०३३५६. सत्तरी तालुका– अवर लेडी ऑफ लुर्ड्स हायस्कुल आसन क्र. ०४००१ ते ०४४१२ साठी.
तिसवाडी तालुका रोझरी हायस्कुल कुजिरा आसन क्रमांक ०५००१ ते ०५३३७ ; एजे डी आल्मेदा हायस्कुल फोंडा तालुका केंद्र आसन क्रमांक ०६००१ ते ०६४२५ ; सरकारी हायस्कुल, सदर फोंडा– आसन क्रमांक ०६४२६ ते ०६६१५. सासस्टी तालुका महिला व नूतन इंग्लिश उच्च माध्यमिक मडगांव, आसन क्रमांक ०७००१ ते ०७२३९, सांगे तालुका युनियन हायस्कूल आसन क्रमांक ०८००१ ते ०८१५८ ; काणकोण तालुका सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय आसन क्रमांक ०९००१ ते ०९२८५ ; सर्वोदय एज्यु येथे केपे तालुका आसन क्रमांक १०००१ ते १०२४२ ; धारबांदोडा तालुका वि.एस.लाड उच्च माध्यमिक शाळा, पिळयें, धारबांदोडा आसन क्रमांक ११००१ ते १११५२ आणि मुरगाव तालुका येंट जोझेफ इन्स्टीट्युट वास्को आसन क्रमांक १२००१ ते १२०९१. परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा सुरू होण्याच्या किमान अर्धा तास अगोदर म्हणजे ९.३० वाजता परीक्षेच्या ठिकाणी उपस्थित रहावे आणि परीक्षा केंद्रावर काळे बॉल पेन आणि त्यांचे लेखन साहित्य आणि हॉल तिकीट सोबत आणावे.

मडगाव-वारका रस्त्यावर गतिरोधक उभारण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १६ : दक्षिण गोवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी मडगाव – वार्का रस्त्यावर, खारेबंद पुलाजवळील जोकिम टेक्सिएरा सिमेंट दुकानाशेजारी असलेल्या अंतर्गत रस्त्याच्या कडेपासून ०७ मीटर अंतरावर एक आणि अंतर्गत रस्त्याच्या कडेपासून १० मीटर अंतरावर ट्रॅपेझोडियल आकाराचे गतिरोधक उभारण्याचे आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे इंग्लिश स्कूलाच्या बाजुने जाणाऱ्या रस्त्यावर ट्रॅपेझोडियल आकाराचे गतिरोधक उभारण्याचे आदेश दिले आहेत. आवश्यक ते सूचना फलकही उभारण्याचे आदेश दिले आहेत.

कमी दर्जाच्या अन्न उत्पादक आणि विक्रेत्यांना दंड

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १६ : अन्न आणि औषद प्रशासन संचालनालयाच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यानी अन्न सुरक्षा आणि मानक कायद्याखाली कमी दर्जाचा शेव चिवडा, काजू आणि पालक चकली उत्पादक आणि विक्रेत्यांविरूद्द केलेल्या कारवाईच्या प्रकरणात उत्तर गोवा अतिरीक्त जिल्हा दंडाधिकारी तथा न्याय अधिकाऱ्यांनी निवाडा देताना अन्न सुरक्षा आणि मानक कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे उत्पादक आणि विक्रेत्यांना दंड भरण्याचा आदेश दिला आहे.
कमी दर्जाचा आणि सिंथेटिक कलर वापरून तयार केलेला मिक्स शेव चिवडा उत्पादन आणि विक्री केल्यामुळे दामाजी के. म्हवळणकर (उत्पादक) आणि मे. महावीर बालाजी स्वीट मार्ट, आल्त पर्वरी यांना १ लाख रूपये दंड भरण्याचा आदेश दिला आहे. लेलेस काजू नावाने कमी दर्जाचे काजू उत्पादन आणि विक्री केल्याबद्दल प्रकाश मे. गोवा काजू डेपोचे मालक प्रकाश बिश्णोई आणि जयराम बिश्णोई, उमतावाडो कळंगूट यांना दोन लाख रूपये दंड भरण्याचा आदेश दिला आहे. तसेच दुसऱ्या एका कारवाईत कमी दर्जाची पालक चकली उत्पादन आणि विक्री केल्यामुळे मे. जननी फुड प्रॉडक्टस, कुंद्रापूर उडपी, कर्नाटक यांना २० हजार रूपये तर प्रभू ट्रेडर्स, बांबोळी आणि मुकेश राजपुरोहित ओम साई जनरल स्टोअर, ताळगाव यांना प्रत्येकी १० हजार रूपये दंड भरण्याचा आदेश दिला आहे.

बंदर कप्तान खात्याकडून मांडवी नदीत वरील बाजूने वाहतूक नाविकांना सूचना

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १६ : मुंबई येथील ओपन व्हॉटर स्वीमींग अकादमी इंडिया यांनी मांडवी नदीत करंझाळे बीच भागात शनिवार दि. १९ आणि रविवार दि. २० रोजी गोवा अक्वेटिक क्रावन २०२५ ओपन व्हॉटर स्वीमींग चॅम्पियन स्पर्धा आयोजित केली आहे. या जलतरण स्पर्धेस कोणतीही अडचण येऊ नये म्हणून बंदर कप्तान खात्याने मांडवी नदीत वरील बाजूने वाहतूक करणाऱ्या सर्व बार्जेस, प्रवासी लॉंचेस, क्रुईज बोटी, जलक्रीडा बोटी, लहान बोटी, फेरीबोटी, मच्छिमार बोटी आणि इतर यांत्रिकीं आणि बिनयांत्रिकी नाविकांनी वरील दिवशी सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यंत आणि २० रोजी सकाळी ७ दुपारी १ वाजेपर्यंत खबरदारी घेवून सावकाश वाहतूक करावी. तसेच गस्त बोटीकडून लाल बावटा दाखवून देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे बंदर कप्तान खात्याने कळविले आहे.

एफडीएच्या कारवाया सुरूच; म्हापशातील हॉटेल बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १६ : गोवा अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) म्हापशातील प्रसिद्ध वाळके हॉटेलला परिसरातील अस्वच्छतेमुळे मंगळवारी बंद करण्याचे आदेश दिले. हॉटेलमधील स्वच्छतेच्या गंभीर त्रुटी आणि अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन लक्षात घेत प्रशासनाने तातडीने ही कारवाई केली.या संदर्भात आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली. ते म्हणाले, एफडीएच्या पथकाने म्हापसा येथे वाळके हॉटेलची तपासणी केली. परिसरात आढळलेल्या अस्वच्छतेमुळे हॉटेल बंद करण्याचे आदेश देण्यात आले. सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी हा निर्णय आवश्यक होता.

आरोग्यमंत्र्यांनी एफडीएच्या जलद आणि ठोस कृतीचे कौतुक करत सांगितले की, असुरक्षित अन्नपदार्थांविषयी एफडीएच्या शून्य-सहिष्णुतेच्या धोरणाचे हे उदाहरण आहे. गोव्यातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी आणि स्वच्छता मानकांचे पालन होण्यासाठी एफडीएचे अधिकारी सतत तत्पर आहेत.

एफडीएच्या संचालक श्वेता देसाई यांच्या नेतृत्वाखालील पथकाने म्हापसा सब-यार्ड व शिवोली येथील आंब्याच्या घाऊक युनिट्समध्ये तपासणी केली. या पथकात रिचर्ड नोरोन्हा, राजाराम पाटील, लेनिन दे सा, अमित मांद्रेकर आणि सफिया खान यांचा समावेश होता.

पथकाने १५ युनिट्सची तपासणी करून आंबा आणि केळी यांसह २८ फळांचे नमुने गोळा केले. तपासणीदरम्यान, म्हापशातील दोन युनिट्समध्ये संशयास्पद पदार्थ आढळून आले, ज्यामुळे १८० क्रेट आंबे आणि सुमारे ४५० किलो केळी जप्त करण्यात आले. हे नमुने रासायनिक अवशेषांच्या चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी ही पावले उचलण्यात आली असल्याचे एफडीएने स्पष्ट केले आहे.

मंत्री राणे यांनी सांगितले की, या कारवाईच्या आधी एफडीएने सासष्टी भागात देखील अशीच तपासणी केली होती. आंब्याचा हंगाम सुरू होताच एफडीएच्या पथकाने मडगावमधील गांधी मार्केटला भेट दिली. येथे शिवोली , कुंडई, मडकई आणि कर्नाटकातून येणारे आंबे विक्रीसाठी ठेवले जातात. विविध जातींच्या आंब्यांचे आणि इतर फळांचे नमुने गोळा करून कृत्रिम पिकवण्याच्या दृष्टीने चाचणीसाठी पाठवण्यात आले, असे त्यांनी सांगितले.

गांधी मार्केटमधील दोन गोदामांबरोबरच तालकोंडे, नावेली आणि सोनसोड्डो येथील गोदामांचीही तपासणी करण्यात आली. तसेच मडगाव, तालकोंडे आणि साओ जोस द अरिअल येथील केळी पिकवण्याच्या कक्षांचीही पाहणी करण्यात आली. तपासणीदरम्यान कोणतेही संशयास्पद रसायन आढळले नसल्याची माहिती देण्यात आली असून एकूण २५ फळांचे नमुने विश्लेषणासाठी पाठवण्यात आले आहेत.

बांबोळी मधील स्टार हॉटेलला काम थांबवण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १६ : गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी ने मंगळवारी बांबोळी येथील एका स्टार हॉटेलच्या व्यवस्थापनाला तात्काळ सर्व बांधकाम थांबवण्याचे आदेश दिले असून, सदर बांधकाम पाडून परिसर पुन्हा मूळ स्थितीत आणण्याचे निर्देश का देण्यात येऊ नयेत, यासंदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

जीसीझेडएमएच्या निर्देशानुसार, हॉटेल व्यवस्थापनाने या जागेवर कोणतेही नविन बांधकाम, पुनर्बांधणी अथवा दुरुस्ती न करता संपूर्ण प्रक्रिया थांबवावी. तसेच, संबंधित बांधकाम अथवा दुरुस्ती कार्यासाठी अधिकृत मंजुरी, परवाने, आराखडे व मालकी हक्क सिद्ध करणारे दस्तऐवज २४ एप्रिल २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी जीसीझेडएमए च्या पणजी कार्यालयात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कारवाईपूर्वी जीसीझेडएमए च्या अधिकाऱ्यांनी मागील आठवड्यात संबंधित ठिकाणी तपासणी केली असता, उत्खननाची कामे यंत्रसामग्रीद्वारे सुरू असल्याचे आढळले. याशिवाय, अंदाजे ३.२ मीटर उंच आणि १० मीटर लांबीचा काँक्रीट रिटेनिंग वॉल उभारलेला असल्याची नोंद झाली आहे.

या प्रकरणी सांतआंद्रेचे आमदार श्री. वीरेश बोरकर, आम आदमी पक्षाचे नेते रामराव वाघ तसेच गोवा ग्रीन ब्रिगेडचे संयोजक ॲव्हर्टिनो मिरांडा यांनी हॉटेलच्या बेकायदेशीर बांधकामाविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर जीसीझेडएमए ने तात्काळ काम थांबवण्याचे आदेश जारी केले.

दरम्यान, गोवा ग्रीन ब्रिगेडने मंगळवारी गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीकडे एक निवेदन सादर करत कोस्टल रेग्युलेटरी झोन (सीआरझेड) नियमांचे स्पष्ट उल्लंघन होत असल्याची माहिती दिली. पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र असलेल्या बांबोळीमध्ये मोठ्या प्रमाणावर माती हलवण्यासाठी यंत्रसामग्री वापरण्यात येत असून, रेडी मिक्स सिमेंटच्या वापरामुळे परिसराचा जैविक समतोल धोक्यात येण्याची शक्यता असल्याचा इशारा त्यांनी दिला. त्यामुळे तात्काळ सर्व कामे थांबवून योग्य ती कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

मडगावमधील वाहतूक कोंडीवर 'पे पार्किंग' प्रस्ताव

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १६ : मडगाव शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यासाठी वाहतूक शाखेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शहराच्या विविध भागांमध्ये पे पार्किंग सुविधा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव मडगाव वाहतूक विभागाने मडगाव नगरपालिका परिषदेच्या निदर्शनास आणून दिला आहे.

वाहतूक पोलिसांनी अलीकडेच नगर परिषदेला पाठवलेल्या पत्रात शहरातील १८ प्रमुख ठिकाणी पे पार्किंग प्रणाली लागू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामागचा उद्देश म्हणजे रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत करणे आणि पार्किंगसंबंधीच्या अडचणी दूर करणे.

वाहतूक शाखेच्या निरीक्षणानुसार, सध्या मडगावमधील अनेक सार्वजनिक पार्किंग जागा काही ठराविक व्यावसायिक प्रतिष्ठानांच्या मालकांकडून आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून दिवसभर व्यापल्या जातात. परिणामी, स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांना अल्पकालीन पार्किंगसाठी पुरेशी जागा मिळत नाही. यामुळे दुहेरी पार्किंग, रस्त्याच्या कडेला वाहनं उभी करणे अशा घटनांमध्ये वाढ होत असून, शहरात वाहतूक कोंडी निर्माण होते.

वाहतूक पोलिसांनी पत्रात नमूद केले आहे की, मडगाव हे एक महत्त्वाचे व्यावसायिक व शैक्षणिक केंद्र असल्याने येथे दररोज हजारो लोकांची वर्दळ असते. शहरात ८,००० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने साल्सेट परिसरातून मोठ्या प्रमाणावर वाहतूक मडगावकडे वळते, ज्याचा ताण शहरातील मुख्य रस्त्यांवर जाणवतो.

शहरातील अरुंद रस्ते आणि मर्यादित पार्किंग जागा ही देखील प्रमुख समस्या असून, त्यामुळे वाहनचालक रस्त्याच्या कडेला गाड्या उभ्या करतात. परिणामी, वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आणि अन्य रस्त्यावरील प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागतो.

वाहतूक विभागाच्या म्हणण्यानुसार, पर्यटन दृष्टिकोनातून मडगावची वाढती ओळखही पार्किंग व्यवस्थेवर अधिक ताण आणत आहे. शहरात नव्याने उभारल्या जाणाऱ्या उंच इमारती आणि व्यावसायिक संकुलांमध्ये पुरेशा पार्किंग सुविधा नसल्यामुळे विद्यमान जागांवर अतिरिक्त भार येतो. त्यामुळे रस्त्याच्या कडेला पार्किंग करण्याची प्रवृत्ती वाढते, ज्याचा थेट परिणाम वाहतुकीच्या सुरळीततेवर होतो.

शहराच्या वाढत्या वाहनसंख्येच्या तुलनेत रस्त्यांचे रुंदीकरण किंवा पार्किंगची वाढ पुरेशी नसल्याचेही या पत्रात अधोरेखित करण्यात आले आहे. परिणामी, शहराच्या वाहतूक व्यवस्थेवर गंभीर ताण निर्माण झाला आहे. वाहतूक शाखेने नगर परिषदेला सुचवले आहे की, शहरातील वाहतूक सुरळीत राखण्यासाठी आणि नागरिकांना योग्य पार्किंग सुविधा मिळवून देण्यासाठी पे पार्किंग योजना लवकरात लवकर लागू करावी.

सोनसोडो बाबत मुख्यमंत्र्यांचे विधान दिशाभूल असल्याचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १६ : मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सोनसोडो कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न निकाली निघाल्याचा दावा केला असला, तरी मडगावमधील नागरिकांनी त्यांच्या विधानाला जोरदार विरोध केला आहे. स्थानिकांच्या मते, ही माहिती दिशाभूल करणारी असून, प्रत्यक्ष परिस्थिती त्याच्या पूर्णपणे विरुद्ध आहे.

सामाजिक कार्यकर्ते सॅव्हियो कुतिन्हो यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मुख्यमंत्र्यांचे विधान हे मडगावमधील काही राजकीय नेत्यांनी पुरवलेल्या अपूर्ण आणि भ्रामक माहितीवर आधारित असल्याचे दिसते. या नेत्यांना प्रत्यक्ष कृतीपेक्षा श्रेय घेण्यात अधिक स्वारस्य आहे.

मुख्यमंत्र्यांनी अलीकडेच सार्वजनिकरित्या जाहीर केले होते की, सोनसोडोतील कचरा समस्येचा निकाल लागला आहे. मात्र, स्थानिक नागरिकांचा अनुभव वेगळाच चित्र दाखवतो. कुतिन्हो यांच्या मते, मुख्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष ठिकाणी भेटही दिली नाही आणि सध्याची परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही.

सोनसोडोतील जुनी कचराकुंडी केवळ अंशतःच साफ करण्यात आली आहे आणि ती देखील कोणत्याही राजकीय इच्छाशक्तीमुळे नव्हे, तर माननीय उच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशांमुळे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. मुख्यमंत्र्यांच्या तोंडून अशा प्रकारचे विधान करवून घेण्याचा प्रयत्न राजकीय नेते करत असले, तरी वस्तुस्थिती वेगळीच आहे, असेही त्यांनी जोडले.

स्थानिक रहिवासी पूजा देसाई यांनी सध्या सुरू असलेल्या समस्यांवर प्रकाश टाकताना सांगितले की, दर आठवड्याला सुक्या कचऱ्याला आग लागते, जी संशयास्पद असून संभाव्य पर्यावरणीय धोका निर्माण करते. याशिवाय, बागेत साचणाऱ्या कचराकडे दुर्लक्ष होत आहे. ठोस नियोजनाशिवाय ओला कचरा थेट काकोडा येथील प्रकल्पात पाठवण्यात येतो, ज्यामुळे अनावश्यक आर्थिक भार जनतेवर पडतो. दरम्यान, स्थानिक रहिवासी कस्टोडिओ फर्नांडिस यांनीही आपल्या नाराजीचा सूर व्यक्त केला. सोनसोडोमध्ये फारसे काही घडत नाही, तरीही काही राजकीय मंडळी श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहेत, हेच सर्वात आश्चर्यकारक आहे, असे त्यांनी सांगितले.

फक्त सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण होणे यापलीकडे कोणतीही ठोस कृती होताना दिसत नाही. बराचसा कचरा काकोडा येथे पाठवला जातो, आणि सोनसोडोची प्रत्यक्ष स्थिती दुर्लक्षितच राहते. रस्त्यावर वाहणाऱ्या कचराकुंड्यांवर स्थायिक उपाय न झाल्याने नगरपालिकेची कार्यक्षमता प्रश्नांकित होते, अशी टीका फर्नांडिस यांनी केली.

संपूर्ण परिस्थितीवरून मडगावमधील नागरिकांची अपेक्षा स्पष्ट आहे. राजकीय भाषणे नव्हे, तर प्रत्यक्ष कृती हवी. नागरिकांनी या दीर्घकालीन प्रश्नावर पारदर्शक, शाश्वत आणि कार्यक्षम उपाययोजनांची जोरदार मागणी केली आहे.

झुरी हॉटेलमधील टॅक्सी चालकांचा ॲप-आधारित सेवांवर आक्षेप

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १६ : झुरी हॉटेलमध्ये कार्यरत असलेल्या स्थानिक टॅक्सी चालकांनी एका अल्प-ज्ञात ॲप-आधारित टॅक्सी सेवेच्या वाढत्या उपस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर परिसरात तणाव निर्माण झाला असून, चालकांनी हॉटेल समोरील प्रवेशद्वारावर नाकाबंदी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सामाजिक कार्यकर्ते वॉरेन आलेमाव यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक चालकांनी निषेधाची भूमिका घेतली आहे. आलेमाव यांनी सांगितले की, हॉटेल्स आणि स्थानिक चालकांमध्ये टॅक्सी सेवा पुरवण्यासाठी पूर्वीपासून ठोस करार आहे. मात्र आता काही अज्ञात ॲप्सद्वारे चालवल्या जाणाऱ्या टॅक्सींना खुलेआम प्रवेश दिला जात आहे. त्यामुळे स्थानिक चालकांच्या उत्पन्नावर विपरित परिणाम होत आहे.

स्थानिक चालकांनी आरोप केला आहे की, या ॲपशी संलग्न अनेक टॅक्सी दररोज हॉटेलमध्ये येऊन पाहुण्यांना उचलतात, ज्यामुळे त्यांचा पारंपरिक व्यवसाय धोक्यात आला आहे. गोवामाइल्ससंबंधीचा वाद काही प्रमाणात सुटला असला तरी या नवीन ॲप्सच्या उदयामुळे आमच्या व्यवसायात नव्याने गोंधळ निर्माण झाला आहे, असे चालकांनी सांगितले. आलेमाव यांनी आणखी एक गंभीर आरोप करत सांगितले की, काही ॲप-आधारित टॅक्सी चालक चाकू घेऊन येतात आणि स्थानिक चालकांना धमकावण्याचा प्रयत्न करतात. ही केवळ उपजीविकेची बाब नाही, आता ही सुरक्षेची बाब बनली आहे, असे ते म्हणाले.

स्थानिक टॅक्सी चालक जोस अल्फोन्सो यांनी परिस्थिती निर्माण होण्यास हॉटेल प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप केला. हॉटेल व्यवस्थापन या बाहेरील चालकांना मूक पाठिंबा देत आहे. सरकारने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अन्यथा ही स्थिती हाताबाहेर जाऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक टॅक्सी संघटना हॉटेल परिसरात अधिकृत चालकांसाठी टॅक्सी स्टँड राखण्यासाठी तसेच अनधिकृत ॲप-आधारित सेवांवर बंदी आणण्यासाठी संबंधित नियमांचे काटेकोर पालन करण्याची मागणी करत आहे. आमचा संयम आता संपत चालला आहे, असे एका स्थानिक चालकाने स्पष्ट शब्दांत सांगितले. आम्ही स्पर्धेला विरोध करत नाही, पण आमच्या उपजीविकेवर गदा येणार नाही याची खात्री होणे गरजेचे आहे. दरम्यान, स्थानिक प्रशासन व पोलीस यंत्रणेला परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी त्वरित हस्तक्षेप करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आत्महत्येच्या खोडसाळ माहितीमुळे आपत्कालीन सेवांची फजिती

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. १६ : फोंडा येथील गोडकेश्वर तळवली येथे एक विचित्र घटना घडली, ज्यामुळे पोलिस, आपत्कालीन सेवा, अग्निशमन विभाग आणि १०८ सेवा कर्मचाऱ्यांचा मौल्यवान एक तास वाया गेला. झाडाला गळफास घेऊन कुणीतरी आत्महत्या केली आहे, अशी माहिती एका स्थानिक व्यक्तीने अग्निशमन विभागाला कळवताच सर्व आपत्कालीन सेवा त्वरित घटनास्थळी धावल्या. तथापि, घटनास्थळी पोहोचल्यावर, झाडावर लटकवण्यात आलेली वस्तू कुठला मानव नसून तो एक बागूलबुवा होता असे आढळून आले. मात्र या प्रकारामुळे स्थानिकांनी तीव्र संताप व्यक्त केला.

अशी तक्रार केल्यामुळे आपत्कालीन सेवांचा महत्त्वाचा वेळ वाया गेला, ज्यामुळे अन्य आपत्कालीन परिस्थितींमध्ये वेळेत सेवा मिळवण्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकला असता. या घटनेमुळे स्थानिकांनी अशा प्रकारच्या तक्रारींना न करता आपत्कालीन सेवांचा वापर केल्यास योग्य ठरेल, असे म्हटले.

तळावली येथील एका स्थानिक शेतकऱ्याने एका आंब्याच्या झाडावर माकडांना घाबरवण्यासाठी दोन भयानक चेहरा असलेले बागूलबुवा लटकवले होते. त्याचा उद्देश माकडांचा उपद्रव थांबवणे होता, जेणेकरून झाडावरची फळे नष्ट होणार नाहीत . तथापि, एका स्थानिकाच्या तक्रारीनंतर सर्व आपत्कालीन सेवा घटनास्थळी धावल्या. तक्रारदाराचा दावा असा होता की रस्त्याच्या कडेला लटकलेल्या कावळ्यामुळे त्यांना त्रास होत आहे आणि ते एक प्रकारची भीती निर्माण करत होते. मात्र, स्थानिकांनी सांगितले की, अशा प्रकारच्या सामान्य घटनांवर त्वरित आपत्कालीन सेवा पाठवणे योग्य नाही.

तुयेच्या सरपंचपदी अनिता साळगावकर

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १६ : तुये सरपंच पदी अनिता आनंद साळगावकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अनिता साळगावकर यांची सरपंच म्हणून निवड झाल्यानंतर मांद्रेचे आमदार जीत आरोलकर यांची भेट घेतली, त्यावेळी आमदार जीत आरोलकर यांनी त्यांना आगामी कार्यकाळासाठी आणि विकास कामांना शुभेच्छा दिल्या.

तूये सरपंच सुलक्षा नाईक यांनी आपल्या पदाचा अलिखित करारानुसार राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त होते. १६ रोजी पंचायत मंडळाची विशेष बैठक सरपंच निवडीसाठी घेण्यात आली होती त्यावेळी अमिता आनंद साळगावकर हिचा एकमेव अर्ज आल्यामुळे तिची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली.यावेळी उपसरपंच मनोहर पेडणेकर, पंच निलेश कानोलकर,पंच स्विटी नाईक आदी पंच उपस्थित होते.

आमदार जीत आरोलकर यांनी सरपंच अनिता साळगावकर यांची भेट घेताना त्यांना शुभेच्छा दिल्या. आमदार जीत आरोलकर यांनी नवनिर्वाचित सरपंच साळगावकर यांनी पंचायत क्षेत्राच्या विकासाला आमदार आणि सरकारकडून जे जे सहकार्य त्यांना अपेक्षित आहे. ते सर्व प्रकारचे सहकार्य दिले जाईल. असे सांगितले.

नवनिर्वाचित सरपंच अनिता साळगावकर यांनी बोलताना आपल्याला जो पंचायत मंडळांनी आपल्यावर विश्वास ठेवून आपल्याला सरपंच पद बहाल केले. त्याला आपण पात्र ठरणार असून पूर्ण पंचायत क्षेत्राचा विकास करताना कसल्याच प्रकारचं राजकारण किंवा मतभेद केले जाणार नाही प्रत्येक विकास कामांना ग्रामस्थांनी आणि पंचायतीने पंचायत मंडळाने सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करत असताना आमदार जीत आरोलकर यांच्या माध्यमातून विकास कामांना गती दिली जाईल, असे त्या म्हणाल्या.